ePaper
ओमान किनारपट्टीवर जहाजावर भीषण हल्ला, 10 भारतीय खलाशांची सुटका
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज™



पान 3 वरुन...

वारकऱ्यांना आश्वासनांचीच प्रसादाची वाटणी!

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 13 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## एआयएडीएमकेचे जवळपास १० आमदार टीव्हीकेत प्रवेश करणार?

# तमिळनाडूत ‘ऑपरेशन एल’

महाईन्यूज । तमिळनाडू

**तमिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीत आपला करीश्मा दाखवणारे नेते जोसेफ विजय यांनी १० मे २०२६ रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यापासून जोसेफ विजय यांनी अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री विजय यांच्या कामाची देशभरात चर्चा होत आहे. असं असतानाच तमिळनाडूच्या राजकारणात सध्या ‘ऑपरेशन एल’ची मोठी चर्चा सुरू असून लवकरच राजकीय भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**



एआयएडीएमकेचे (AIADMK) जवळपास १० आमदार आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देऊन मुख्यमंत्री विजय यांच्या टीव्हीकेमध्ये सामील होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री विजय यांच्या पक्षांतर्गत वर्तुळात या संदर्भातील प्रक्रियेचा अनौपचारिकपणे ‘ऑपरेशन एल’ असा उल्लेख जात असल्याची माहिती समोर आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, टीव्हीके पक्षाचे नेते आणि एआयएडीएमकेच्या १० आमदारांमध्ये वाटाघाटींबाबत चर्चा सुरू आहेत. विरोधी पक्षातील जवळपास १० आमदार हे १५ ऑगस्टच्या आधी आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देऊ शकतात आणि त्यानंतर ते टीव्हीके पक्षात प्रवेश करून पुन्हा पोटनिवडणुकीला सामोरं जाऊ शकतात. या चर्चेत सहभागी असलेल्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितलं की, “ही प्रक्रिया १५ ऑगस्ट पूर्वी पूर्ण होईल. तसेच पोटनिवडणुकीचे वेळापत्रक जाहीर होण्यापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचं उद्दिष्ट आहे.”

दरम्यान, तमिळनाडूच्या विधानसभेत २३४ जागा आहेत, यातील ७ जागा सध्या रिक्त असल्यामुळे एकूण सदस्य संख्या २२७ वर आली आहे. सध्या टीव्हीकेचं संख्याबळ १०७ एवढं आहे. यातच एआयएडीएमकेचे माजी मंत्री सी.विजयभास्कर आणि एम.आर. विजयभास्कर यांनी काही दिवसांपूर्वीच आमदारकीचा राजीनामा देत टीव्हीकेत प्रवेश केला. त्यांच्याशिवाय अनेक माजी आमदारांनीही टीव्हीकेत प्रवेश केला. याआधी एआयएडीएमकेच्या चार आमदारांनी राजीनामे देऊन टीव्हीकेत प्रवेश केला होता. त्यामुळे विरोधी पक्षाचं संख्याबळ कमी झालं आहे, तर सत्ताधारी पक्ष बहुमताच्या जवळ पोहोचण्यासाठी हालचाली करत आहे.

## AIADMK मध्ये नाराजी

एका इंग्रजी वृत्तपत्राशी बोलताना AIADMKच्या एका वरिष्ठ नेत्याने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर पक्षातील नाराजी मान्य केली. त्यांच्या मते, पक्ष नेतृत्वाने अंतर्गत मतभेद आणि संघटनात्मक अडचणी दूर करण्यासाठी ठोस प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे अनेक नेत्यांमध्ये उपेक्षित असल्याची भावना निर्माण झाली असून त्याचा परिणाम आता पक्षबदलाच्या स्वरूपात दिसत आहे.

## विजयला कोणत्या पक्षाचा पाठिंबा?

तमिळनाडूच्या निवडणुकीत जोसेफ विजय यांच्या टीव्हीके पक्षाने १०७ जागा जिंकल्या. मात्र, तरी टीव्हीके पक्षाला सरकार स्थापन करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागली होती. त्यामुळे तमिळनाडूत काही दिवस सत्तास्थापनेचा पेच निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं होतं. त्यानंतर अखेर ‘सीपीआय-एम’ आणि काँग्रेसने टीव्हीकेला पाठिंबा दिल्यानंतर जोसेफ विजय यांनी सरकार स्थापन केलं.

## राजकीय भवितव्याची हमी?

TVK केवळ नेत्यांना पक्षात प्रवेश देत नसून त्यांच्या राजकीय भवितव्याचीही हमी देत असल्याचे सांगितले जात आहे. राजीनामा देणाऱ्या आमदारांना पोटनिवडणुकीत पक्षाचे उमेदवारी

देण्याचे आश्वासन दिले जात आहे. त्याचबरोबर पुन्हा निवडून आलेल्या वरिष्ठ नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. इतर नेत्यांना जिल्हाध्यक्ष, जिल्हा सचिव किंवा पक्ष संघटनेतील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्याचाही विचार सुरू असल्याचे समजते.

# २० मिनिटांचा संघर्ष अन् मोठा अनर्थ टळला!

## प्रिंटिंग यंत्रणा व कच्चा मालाचे नुकसान; इमारतीतील सर्व रहिवासी सुखरूप

**महाईन्यूज । पुणे**

**सदाशिव पेठेतील कुमठेकर रस्त्यावर असलेल्या फ्लेक्स प्रिंटिंगच्या दुकानाला रविवारी मध्यरात्री भीषण आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्परतेने घटनास्थळी धाव घेत अवघ्या १५ ते २० मिनिटांत आग आटोक्यात आणल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नसली, तरी फ्लेक्स प्रिंटिंग यंत्रणा, कच्चा माल आणि अन्य साहित्याचे मोठे नुकसान झाले.**






कुमठेकर रस्त्यावरील पाच मजली इमारतीत पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर ‘लकी कॉपिअर्स’ हे फ्लेक्स प्रिंटिंगचे दुकान आहे. रविवारी रात्री सुमारे एकच्या सुमारास दुकानातून मोठ्या प्रमाणात धूर येत असल्याचे रहिवाशांच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने अग्निशमन दलाला माहिती दिल्यानंतर कसबा पेठ आणि एरंडवणे अग्निशमन केंद्राचे बंब घटनास्थळी दाखल झाले.

प्रभारी अधिकारी कमलेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली तांडेल हरीश बुंदेले, मुश्ताक शेख, राजेंद्र महाडिक, दत्तात्रय सहाणे, सनी लोखंडे आणि जवानांनी पाण्याचा मारा करून आग नियंत्रणात आणली. आग आटोक्यात आल्यानंतर जवानांनी दुकानाची पाहणी करून आत कोणी अडकले नसल्याची खात्री केली.

आगीमुळे दुकानातील प्रिंटिंग मशीन, फ्लेक्स प्रिंटिंगसाठीचा कच्चा माल आणि अन्य साहित्याचे नुकसान झाले. आग लागल्यानंतर इमारतीतील रहिवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मध्यरात्री अडीचपर्यंत आग पूर्णपणे विझविण्याचे काम सुरू होते.

सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, त्याबाबत अग्निशमन दलाकडून तपास सुरू आहे.

### आगीचे कारण अद्याप अस्पष्ट

सदाशिव पेठेतील फ्लेक्स प्रिंटिंग दुकानाला आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अग्निशमन दलाने घटनास्थळाची पाहणी केली असून, आगीच्या कारणाचा तपास सुरू आहे.

### २० मिनिटांत आगीवर नियंत्रण

रात्री एकच्या सुमारास आग लागल्याची माहिती मिळताच कसबा पेठ आणि एरंडवणे अग्निशमन केंद्राचे बंब घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अवघ्या १५ ते २० मिनिटांत आगीवर नियंत्रण मिळवून मोठी दुर्घटना टाळली.

# धनकवडीतील उड्डाणपुलाजवळ सिमेंटच्या गट्टूयाने ठेचून एकाचा खून




**महाईन्यूज । पुणे**

**पुणे-सातारा रस्त्यावरील श्री शंकर महाराज उड्डाणपुलाजवळील भुयारी मार्गात एका अनोळखी व्यक्तीच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून निर्घृण खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शनिवारी मध्यरात्री ही घटना घडली असून, मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. या प्रकरणी सहकारनगर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी भुयारी मार्गात एक व्यक्ती गंभीर जखमी अवस्थेत पडल्याची माहिती सहकारनगर पोलिसांना मिळाली. त्यानंतर सहायक पोलीस आयुक्त गजानन पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल पवार यांच्यासह पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

### मध्यरात्रीची घटना

शनिवारी मध्यरात्री श्री शंकर महाराज उड्डाणपुलाजवळील भुयारी मार्गात ही घटना घडली. रविवारी सकाळी गंभीर जखमी अवस्थेत व्यक्ती आढळल्यानंतर पोलिसांना माहिती मिळाली. उपचारासाठी नेण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.

घटनास्थळाच्या पाहणीत रक्ताने माखलेला सिमेंटचा गट्टू आणि फरशी आढळून आली. प्राथमिक तपासात डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून त्या व्यक्तीचा खून करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. जखमीला उपचारासाठी नेण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.

मृताची ओळख पटविण्याचे काम सुरू असून, तो फिरस्ता असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज जप्त करण्यात आले असून, त्याच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे.

या प्रकरणी पोलीस शिपाई आकाश कीर्तीकर यांनी सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

### मृताची ओळख अद्याप गूढ

खून झालेल्या व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. तो फिरस्ता असावा, असा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. मृताची ओळख पटविण्यासाठी विविध पोलीस ठाण्यांशी संपर्क साधण्याबरोबरच बेपत्ता व्यक्तींची माहितीही तपासली जात आहे.




# हत्यारे काढली... पण ग्रामस्थच भिडले!

**महाईन्यूज । पुणे**

जुन्नर तालुक्यातील कोळवाडी येथे रविवारी चोरीच्या संशयावरून सिनेस्टाईल थरार घडला. संशयास्पद बोलेरो वाहनातून फिरणाऱ्या पाच जणांपैकी दोघांना ग्रामस्थांनी धाडसाने पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले, तर हत्यारे दाखवत तिघांनी घटनास्थळावरून पलायन केले.

पोलिसांनी सोनुसिंग पापसिंग दुधानी (रा. हडपसर) आणि जिलूसिंग शेरसिंग दुधानी (रा. खोपोली) या दोघांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडील बोलेरो वाहन चोरीचे असल्याचा संशय असून, त्यातून विविध प्रकारची हत्यारेही जप्त करण्यात आली आहेत.

स्थानिक नागरिक विघ्नेश घोलप यांनी संशयास्पद वाहनाची चौकशी करून चावी मागितल्यानंतर वाद झाला. यावेळी संशयितांनी हत्यारे बाहेर काढल्याने परिसरात खळबळ उडाली. ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखत एका संशयिताला घटनास्थळीच पकडले, तर दुसऱ्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. मात्र, त्यांच्या तीन साथीदारांनी पळ काढला.

घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत त्यांच्यावर राज्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. फरार तिघांचा शोध सुरू असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

# वारकऱ्यांना आश्वासनांचीच प्रसादाची वाटणी!

## दोन दशकांपासून भवनाची प्रतीक्षा; यंदाच्या वारीतही गैरसोयींचा अध्याय कायम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा देहूनंतरचा पहिला मुक्काम असलेल्या आकुर्डी येथील वारकऱ्यांच्या निवासाचा प्रश्न गेल्या दोन दशकांपासून प्रलंबित आहे. महापालिकेने २००६ मध्ये वारकरी भवन उभारण्याचा ठराव मंजूर करून निधीही मंजूर केला होता. मात्र, तब्बल २० वर्षांनंतरही वारकरी भवनाची उभारणी कागदावरच असल्याने यंदाच्या आषाढी वारीतही वारकऱ्यांना गैरसोयींचा सामना करावा लागला.**



आकुर्डीतील श्री विठ्ठल मंदिर परिसरात दरवर्षी संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा देहूनंतरचा पहिला मुक्काम असतो. पालखी सोहळ्यात हजारो वारकरी, दिंड्या, फडकरी आणि सोहळा प्रमुख सहभागी होत असल्याने उपलब्ध जागा अपुरी पडते. त्यामुळे निवास, विश्रांती आणि इतर मूलभूत सुविधांचा प्रश्न निर्माण होतो. ही समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आकुर्डीतील खंडोबा माळ येथील २२ गुंठे जागेत वारकरी भवन उभारण्याची मागणी वारकरी संप्रदायाकडून सातत्याने केली जात आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने डिसेंबर २००६ मध्ये वारकरी भवन उभारणीचा ठराव मंजूर केला होता. यासाठी ६६ लाख ९८ हजार रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला होता. मात्र, त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवातच झाली नाही. सन २०२४ मध्ये तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित जागेची पाहणी करून वारकरी भवन उभारण्याचे आश्वासन दिले होते. तसेच २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात या प्रकल्पाचा समावेशही करण्यात आला. मात्र, त्यानंतरही काम पुढे सरकलेले नाही.

वाढते शहरीकरण आणि पालखी सोहळ्यातील वाढती गर्दी लक्षात घेता वारकरी भवनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. वारकऱ्यांना सुरक्षित आणि प्रशस्त निवास उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेने तातडीने बांधकाम सुरू करावे, अशी मागणी वारकरी संप्रदायातून होत आहे. देहू संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांनी सांगितले की, संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा पहिला मुक्काम आकुर्डीत होत असल्याने येथे आधुनिक आणि प्रशस्त वारकरी भवन उभारणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे हजारो वारकऱ्यांच्या निवासाची कायमस्वरूपी व्यवस्था होईल.

दरम्यान, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी खंडोबा माळ येथील जागेवर वारकरी भवन उभारण्याचे नियोजन सुरू असून त्यासाठी आर्किटेक्टची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच बांधकामासाठी अर्थसंकल्पात आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. मात्र, वारकरी भवन प्रत्यक्षात कधी उभे राहणार, याकडे वारकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### वारकरी भवनाची गरज का?

आकुर्डी हे जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे देहूनंतरचे पहिले मुक्कामाचे ठिकाण आहे. दरवर्षी हजारो वारकरी, दिंड्या आणि फडकरी येथे मुक्काम करतात. मात्र, अपुऱ्या जागेमुळे निवास, विश्रांती आणि मूलभूत सुविधांची मोठी गैरसोय होते. कायमस्वरूपी वारकरी भवन उभारल्यास ही समस्या मोठ्या प्रमाणात दूर होणार आहे.

### २० वर्षांचा रखडलेला प्रकल्प

डिसेंबर २००६ : वारकरी भवन उभारणीचा ठराव मंजूर
२२ गुंठे : खंडोबा माळ येथे जागा निश्चित
₹६६.९८ लाख : प्रारंभीचा निधी मंजूर
२०२४ : तत्कालीन आयुक्तांनी पाहणी करून उभारणीचे आश्वासन
२०२४-२५ अर्थसंकल्प : प्रकल्पाचा समावेश
२०२६ : प्रत्यक्ष बांधकामाला अद्याप सुरुवात नाही

# हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रोला पुन्हा ब्रेक; १५ जुलैचा मुहूर्त हुकण्याची शक्यता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनाला पुन्हा विलंब होण्याची चिन्हे आहेत. माण ते बालेवाडी या टप्प्यावर १५ जुलैपासून मेट्रो सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त (सीएमआरएस) यांच्याकडून अंतिम सुरक्षा प्रमाणपत्र अद्याप प्राप्त झाले नसल्याने नियोजित दिवशी सेवा सुरू होण्याची शक्यता धूसर झाली आहे. परिणामी, वाहतूक कोंडीने त्रस्त हिंजवडी आयटी पार्क परिसरातील सुमारे १० लाख आयटी कर्मचारी आणि नागरिकांची प्रतीक्षा आणखी वाढली आहे.**



माण ते बालेवाडी या पहिल्या टप्प्यातील १२ स्थानकांची सुरक्षा तपासणी सीएमआरएसने पूर्ण केली आहे. मात्र, तपासणीनंतरचा अंतिम अहवाल आणि व्यावसायिक प्रवासी वाहतुकीसाठी आवश्यक असलेले सुरक्षा प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय मेट्रो सेवा सुरू करता येणार नाही. त्यामुळे तांत्रिक कामे पूर्ण असली तरी प्रत्यक्ष प्रवासी सेवा सुरू करण्यासाठी हिरवा कंदील मिळालेला नाही.

पीएमआरडीएच्या सूत्रांनुसार, सीएमआरएसचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतरही विविध तांत्रिक, प्रशासकीय आणि कार्यान्वयनाशी संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किमान १५ ते २० दिवस लागतील. त्यामुळे जुलैमध्ये सेवा सुरू होण्याची शक्यता कमी असून, ऑगस्ट किंवा सप्टेंबरमध्ये मेट्रो धावण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या २३ किलोमीटर लांबीच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आतापर्यंत तब्बल पाच वेळा अंतिम मुदत बदलण्यात आली आहे. सुरुवातीला संपूर्ण मार्ग एकाच टप्प्यात सुरू करण्याचे नियोजन होते. मात्र, कामातील विलंबामुळे राज्य सरकारने टप्प्याटप्प्याने सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार माण ते बालेवाडी हा पहिला टप्पा सुरू करण्यावर भर देण्यात आला होता.

पीएमआरडीएचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी विकसक कंपनीला वेळेत काम पूर्ण करण्याच्या वारंवार सूचना दिल्या होत्या. तरीही सुरक्षा मंजुरीची प्रक्रिया पूर्ण न झाल्याने उद्घाटन पुन्हा लांबले आहे. यामुळे प्रकल्पातील समन्वय आणि नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

हिंजवडी आयटी पार्क परिसरातील तीव्र वाहतूक कोंडी, वाढता प्रवासाचा वेळ आणि दैनंदिन गैरसोयींमुळे हजारो आयटी कर्मचारी आधीच त्रस्त आहेत. मेट्रो सुरू झाल्यास मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, वारंवार पुढे ढकलल्या जाणाऱ्या उद्घाटनामुळे आयटीयन्समध्ये नाराजी वाढली आहे. दरम्यान, "सीएमआरएसचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. पाहणी प्रक्रिया सुरू असून अहवाल मिळाल्यानंतर १५ ते २० दिवसांत मेट्रो सेवा सुरू करता येईल," अशी माहिती पीएमआरडीएच्या मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी दिली आहे.

### १० लाख आयटी कर्मचारी प्रतीक्षेत

हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक कोंडीमुळे दररोज लाखो कर्मचारी त्रस्त आहेत. मेट्रो सुरू झाल्यास प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, उद्घाटन पुन्हा लांबल्याने आयटी कर्मचारी आणि नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



## भूमिका

**मराठवाडा यंदा दुहेरी संकटाचा सामना करत आहे. एकीकडे अपुऱ्या पावसामुळे दुष्काळाची तीव्र छाया असून शेतकरी पाणी, चारा आणि पिकांच्या चिंतेत आहे. दुसरीकडे हिंगोली, नांदेड आणि लातूर परिसरात जाणवलेल्या भूकंपाच्या धक्क्यांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे.**

# धरा थरथरली; सज्जतेची हीच वेळ



जीवितहानी झाली नसली, तरी या घटनेने १९९३ च्या किल्लारी भूकंपाच्या वेदनादायी आठवणी पुन्हा जाग्या केल्या आहेत. त्यामुळे धरणीकंप हा केवळ नैसर्गिक प्रकार नसून मानसिक आणि सामाजिक अस्वस्थतेचेही कारण ठरत आहे.

मराठवाडा हा दख्खनच्या पठाराचा भाग असला, तरी या प्रदेशात भूगर्भातील दोषरेषांमुळे अधूनमधून भूकंपाचे धक्के जाणवत असतात. भूगर्भशास्त्रज्ञांच्या मते, भारतीय भूपट्ट्याच्या हालचालींमुळे निर्माण होणारा ताण आणि भूगर्भातील बदल यामुळे अशा घटना घडतात. त्यामुळे या भागातील सातत्याने जाणवणाऱ्या धक्क्यांचा सखोल वैज्ञानिक अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील भूगर्भतज्ज्ञांची समिती नियुक्त करून दीर्घकालीन उपाययोजना आखणे ही काळाची गरज आहे.

यापेक्षाही महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आपत्ती व्यवस्थापनाचा. भूकंपाच्या वेळी अनेक नागरिकांना अधिकृत माहिती मिळाली नाही किंवा आपत्कालीन यंत्रणेशी संपर्क साधता आला नाही. अशा परिस्थितीत अफवा वेगाने पसरतात आणि भीती वाढते. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात सक्षम नियंत्रण कक्ष, तातडीची माहिती देणारी यंत्रणा आणि नियमित आपत्ती व्यवस्थापन सराव अनिवार्य केला पाहिजे. शाळा, महाविद्यालये आणि ग्रामपातळीवर जनजागृती करून नागरिकांना भूकंपाच्या वेळी घ्यावयाची काळजी शिकविणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

भूकंपाचा अचूक अंदाज आजही शक्य नसला, तरी सज्जता नक्कीच शक्य आहे. भूकंपरोधक बांधकामांचे नियम काटेकोरपणे लागू करणे, जुन्या इमारतींचे सर्वेक्षण करणे आणि पडझड झालेल्या घरांना तातडीची मदत देणे आवश्यक आहे. मराठवाड्यासमोरील हे संकट शासन, प्रशासन आणि समाजाने एकत्रितपणे हाताळण्याची गरज आहे. निसर्गाच्या या इशाऱ्याकडे गांभीर्याने पाहून तातडीने ठोस पावले उचलली, तर भविष्यातील मोठे नुकसान टाळणे शक्य होईल. सजग प्रशासन, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि नागरिकांची तयारी हीच अशा संकटांवर मात करण्याची खरी गुरुकिल्ली ठरेल.

## प्रासंगिक »

### इंद्रियांवर ताबा

**एक महात्मा रस्त्याने जात असताना त्यांना ताजी, रसाळ लिंबे दिसली. ती पाहून त्यांच्या तोंडाला पाणी सुटले. त्यांनी लिंबे हातात घेऊन पाहिली; पण जिभेच्या चोचल्याला बळी पडू नये म्हणून ते पुढे निघून गेले.**

तरीही मन पुन्हा लिंबांकडे ओढले गेले. ते दोन-तीन वेळा लिंबूवाल्याकडे जाऊन परत आले. अखेरीस त्यांनी दोन लिंबे विकत घेतली.

घरी आल्यावर त्यांनी लिंबे कापली. एक फोड तोंडाजवळ नेताच त्यांच्या मनाने त्यांना प्रश्न केला, "तू जिभेचा गुलाम झाला आहेस का?" हे ऐकताच महात्मा थबकले. तेवढ्यात पत्नी आली. महात्म्यांनी कापलेली लिंबे तिच्या हातात देत सांगितले, "मी ही लिंबे खाणार नाही.

आज मी माझ्या जिभेवर आणि इंद्रियांवर विजय मिळवला आहे. इच्छा झाली म्हणून प्रत्येक वेळी तिच्या मागे धावणे योग्य नाही."

- तात्पर्य : मन आणि इंद्रियांवर नियंत्रण ठेवणे हीच खरी साधना आहे. आत्मसंयमामुळेच व्यक्तिमत्त्व घडते आणि जीवनात यश, समाधान व आत्मबल प्राप्त होते.

लोकशाहीत निवडून आलेले लोकप्रतिनिधी हे केवळ कायदे करणारे नसतात, तर समाजासाठी आदर्श घालून देणारे नेतृत्वही असते. त्यांच्या प्रत्येक कृतीकडे नागरिक बारकाईने पाहत असतात.

# लोकप्रतिनिधींचे वर्तनच लोकशाहीची खरी ओळख



त्यामुळे सार्वजनिक जीवनात संयम, सभ्यता आणि जबाबदारी या गुणांना विशेष महत्त्व असते. दुर्दैवाने, अलीकडच्या काळात काही लोकप्रतिनिधींनी अधिकारी, कर्मचारी किंवा सामान्य नागरिकांशी मारहाण, धमकी आणि दादागिरीची भाषा वापरल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. या घटना केवळ व्यक्तींचा अपमान करत नाहीत, तर लोकशाही व्यवस्थेच्याच प्रतिष्ठेला धक्का देतात. महाराष्ट्राच्या राजकारणाला यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, आर. आर. पाटील यांसारख्या संयमी आणि सुसंस्कृत नेतृत्वाची परंपरा लाभली आहे. मतभेद असले तरी संवादातून प्रश्न सोडविण्याची त्यांची शैली आजही आदर्श मानली जाते. लोकांमध्ये मिसळणे, अधिकाऱ्यांचा सन्मान राखणे आणि पदाचा वापर सेवेसाठी करणे हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ओळख होती. त्यामुळे जनतेचा विश्वासही त्यांच्यावर कायम राहिला.

आजच्या काळात मात्र काही ठिकाणी पदाचा अर्थ अधिकार गाजवणे, अधिकाऱ्यांना धाक दाखवणे किंवा संतापाच्या भरात हात उगारणे असा घेतला जात असल्याचे चित्र दिसते. लोकप्रतिनिधींनी गैरव्यवस्थेविरोधात आवाज उठवणे आवश्यकच आहे; मात्र त्यासाठी कायदेशीर मार्ग, प्रशासकीय यंत्रणा आणि लोकशाहीतील संवादाची साधने उपलब्ध आहेत. मारहाण किंवा धमकी हा कोणत्याही समस्येचा उपाय असू शकत नाही. अशा घटनांमुळे प्रशासनावर दबाव निर्माण होतो आणि समाजात चुकीचा संदेश जातो की, ताकद हीच न्यायाची भाषा आहे. लोकप्रतिनिधींच्या वर्तनाचा परिणाम समाजावर, विशेषतः तरुण पिढीवर होतो. नेतृत्व जर संयमी, सुसंस्कृत आणि जबाबदार असेल, तर समाजातही त्याचे सकारात्मक प्रतिबिंब उमटते.

उलट दादागिरीचे उदात्तीकरण झाले, तर लोकशाहीची मूल्ये कमकुवत होतात. म्हणूनच प्रत्येक जनप्रतिनिधीने आपल्या पदाचा सन्मान राखत कायद्याचे पालन करणे आणि सार्वजनिक वर्तनात आदर्श ठेवणे आवश्यक आहे. लोकशाहीत खरा नेता तोच, जो भीती निर्माण करत नाही तर विश्वास निर्माण करतो. अधिकारापेक्षा आचार मोठा असतो, हे लक्षात ठेवून लोकप्रतिनिधींनी संयम, संवाद आणि सेवाभाव या मूल्यांना प्राधान्य दिले, तरच महाराष्ट्राची सुसंस्कृत राजकीय परंपरा अधिक बळकट होईल.

## ।। अभंगवाणी ।।



दुःखाची संगति ।
तिच्याठायीं कोण प्रीति ॥१॥

अवधें असो हें निराळें ।
करूं सोइरें सावळें ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रोहित पवारांच्या कारखान्यावर प्रदूषणाचे सावट

## 'एमपीसीबी'चा कारवाईचा इशारा; हवा व जलप्रदूषणाच्या तक्रारीनंतर तपासणी

**महाईन्यूज । बारामती**

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो साखर कारखान्याला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. इंदापूर तालुक्यातील शेटफळगडे येथील कारखान्यात पर्यावरण नियमांचे उल्लंघन, तसेच हवा आणि जलप्रदूषण होत असल्याचा ठपका ठेवत मंडळाने सात दिवसांत खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मंडळाच्या वैध संमतीशिवाय कारखाना चालवू नये, असा इशाराही देण्यात आला आहे.**



शेटफळगडे येथील ग्रामस्थ सागर वाबळे आणि छगन वाबळे यांनी कारखान्यामुळे प्रदूषण होत असल्याची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली होती. त्यानुसार मंडळाच्या अधिकाऱ्यांनी ३ जुलै रोजी कारखान्याची पाहणी केली. तपासणीत पर्यावरणविषयक नियमांचे पालन करण्यात त्रुटी आढळल्याचा दावा मंडळाने केला आहे.

नोटीसमध्ये प्रक्रिया न केलेले औद्योगिक सांडपाणी तलावात सोडण्यात येत असून तेथून सिंचन कालव्यात झिरपत असल्याचा उल्लेख आहे. तसेच प्रक्रिया केलेले व न केलेले सांडपाणी साठविण्याची व्यवस्था अपुरी असल्याने परिसरातील विहिरी आणि कालव्यांमध्ये प्रदूषणाचा धोका निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. हायड्रोक्लोरिक ॲसिडच्या साठवणुकीसाठीही आवश्यक शास्त्रीय व्यवस्था नसल्याने वायू उत्सर्जन होत असल्याचा ठपकाही मंडळाने ठेवला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी बाबासाहेब कुकडे यांनी सांगितले की, कारखान्याला सात दिवसांत उत्तर देण्यास सांगण्यात आले आहे. समाधानकारक खुलासा न मिळाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. दरम्यान, या प्रकरणावर आमदार रोहित पवार यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

### नेमके प्रकरण काय?

बारामती ॲग्रोचा इंदापूर तालुक्यातील शेटफळगडे येथे साखर कारखाना आहे. या कारखान्यामुळे प्रदूषण होत असल्याची तक्रार शेटफळगडे येथील सागर वाबळे आणि छगन वाबळे यां ग्रामस्थांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने मंडळाच्या अधिकाऱ्यांनी ३ जुलैला कारखान्याची तपासणी केली. त्यावेळी कारखान्यात पर्यावरण नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले. मंडळाने कारखाना चालविताना आखून दिलेल्या नियमांचे पालन न केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी मंडळाने कारखान्याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

### ... तर कायदेशीर कारवाईचे पाऊल

हवा आणि जलप्रदूषण केल्याप्रकरणी बारामती ॲग्रो साखर कारखान्याला कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. त्यांना या उत्तर देण्यास सात दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. त्यांनी या कालावधीत उत्तर न दिल्यास कायदेशीर कारवाईचे पाऊल उचलले जाईल. यापुढील काळात मंडळाच्या वैध संमतीशिवाय कारखाना चालवू नये, असेही निर्देश देण्यात आले आहेत, असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी बाबासाहेब कुकडे यांनी दिली.

# मधमाशांचा हल्ला; पर्यावरण मोहिमेतील ४० विद्यार्थी जखमी

**महाईन्यूज । कराड**

**पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सीडबॉल प्रत्यारोपण आणि वृक्षारोपण मोहिमेदरम्यान कराडजवळील आगाशिव डोंगरावर मधमाशांच्या थव्याने विद्यार्थ्यांवर हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात मधमाशांच्या दंशामुळे तसेच जीव वाचवण्यासाठी झालेल्या धावपळीत सुमारे ४० विद्यार्थी किरकोळ जखमी झाले. सुदैवाने सर्व विद्यार्थ्यांवर वेळीच उपचार करण्यात आल्याने मोठी दुर्घटना टळली.**



मलकापूर येथील आगाशिवनगर परिसरातील श्री लक्ष्मीदेवी शिक्षण प्रसारक मंडळाच्या नूतन मराठी प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या वतीने हा पर्यावरणपूरक उपक्रम आयोजित करण्यात आला होता. इयत्ता आठवी आणि नववीतील सुमारे ५० विद्यार्थी शिक्षकांसह आगाशिव डोंगरावरील वन विभागाच्या कार्यालयामागील परिसरात सीडबॉल प्रत्यारोपण आणि वृक्षारोपण करत होते.

विद्यार्थी उत्साहाने काम करत असतानाच अचानक मधमाशांचा मोठा थवा त्यांच्या दिशेने आला आणि हल्ला चढवला. त्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. स्वतःचा बचाव करण्यासाठी विद्यार्थी सैरावैरा पळू लागले. या धावपळीत अनेक विद्यार्थी घसरून पडले, तर काहींना मधमाशांनी दंश केला.

घटनेची माहिती मिळताच मुख्याध्यापक, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापनाने तातडीने घटनास्थळी धाव घेत विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढले. त्यानंतर सर्व जखमी विद्यार्थ्यांना कराड येथील वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय पथकाने तातडीने उपचार केल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे स्पष्ट केले. उपचारानंतर विद्यार्थ्यांना पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

प्राथमिक माहितीनुसार, वनक्षेत्रातील मधमाशांच्या पोळ्याला अनवधानाने धक्का लागल्याने किंवा मोठ्या आवाजामुळे मधमाशा आक्रमक झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे निसर्गरम्य भागात उपक्रम राबविताना आवश्यक खबरदारी घेण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

### हल्ल्याचे प्राथमिक कारण काय?

वन विभागाच्या परिसरातील झाडावरील मधमाशांच्या पोळ्याला अनवधानाने धक्का लागल्याने किंवा मोठ्या आवाजामुळे मधमाशा आक्रमक झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेनंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

# मंत्रीही वाचले नाहीत! सुट्टे पैसे नसल्याने बसमधून उतरवले

## गुप्त पाहणीत परिवहन व्यवस्थेचा बोजवारा उघड; चालक आणि कंडक्टरवर तातडीची कारवाई

**महाईन्यूज । बंगळुरू**

**सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील प्रवाशांच्या अडचणींची प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी सामान्य प्रवाशाच्या वेशात बसने प्रवास करणाऱ्या कर्नाटकचे परिवहन मंत्री बायराथी सुरेश यांना धक्कादायक अनुभव आला. तिकिटासाठी सुट्टे पैसे नसल्याचे कारण देत बस कंडक्टरने त्यांना थेट बसमधून खाली उतरायला सांगितले. या घटनेनंतर संबंधित बस चालक आणि कंडक्टरवर अवघ्या दोन तासांत निलंबनाची कारवाई करण्यात आली.**





### १० पेक्षा अधिक बसमधून प्रवास

कर्नाटकचे परिवहन मंत्री बायराथी सुरेश यांनी सुमारे दोन तासांत १० पेक्षा अधिक बसमधून सामान्य प्रवाशाप्रमाणे प्रवास केला. यावेळी त्यांनी प्रवाशांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि अचानक तपासण्या पुढेही सुरू राहतील, असे स्पष्ट केले.

बंगळुरू शहरात बसमध्ये तिकीटासाठी सुट्ट्या पैशांवरून प्रवासी आणि कंडक्टर यांच्यात वारंवार वाद होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे येत होत्या. या तक्रारींची सत्यता जाणून घेण्यासाठी परिवहन मंत्री बायराथी सुरेश यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता मास्क घालून सामान्य प्रवाशाप्रमाणे बसने प्रवास करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे बसमधील कर्मचारी त्यांना ओळखू शकले नाहीत.

प्रवासादरम्यान कंडक्टरने तिकीटासाठी पैसे मागितले असता मंत्र्यांनी १०० रुपयांची नोट दिली. मात्र, सुट्टे पैसे नसल्याचे सांगत कंडक्टरने त्यांना थेट बसमधून खाली उतरून जाण्यास सांगितले. या प्रसंगातून सामान्य प्रवाशांना रोज कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, याचा प्रत्यक्ष अनुभव मंत्र्यांना आला.

याच पाहणीदरम्यान आणखी एक गंभीर प्रकार उघड झाला. एका बसथांब्यावर प्रवासी उभे असतानाही बस न थांबवता चालकाने पुढे नेल्याचे मंत्र्यांच्या निदर्शनास आले. या दोन्ही घटनांची तत्काळ दखल घेत परिवहन विभागाने संबंधित बस चालक आणि कंडक्टरला दोन तासांच्या आत निलंबित केले.

दरम्यान, मंत्री बायराथी सुरेश यांनी सुमारे दोन तासांत दहापेक्षा अधिक बसमधून प्रवास करून प्रवाशांच्या समस्या जाणून घेतल्या. बससेवेनंतर त्यांनी एका ऑटो-रिक्षा चालक आणि प्रवाशामधील वादातही मध्यस्थी केली. मीटरवर ३० रुपये भाडे दिसत असतानाही रिक्षाचालकाने ३६ रुपयांची मागणी केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

या पाहणीनंतर बोलताना मंत्री बायराथी सुरेश यांनी सांगितले की, प्रवाशांना दर्जेदार आणि सन्मानाची सेवा मिळावी, यासाठी अशा अचानक तपासण्या यापुढेही सुरू राहतील. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी दूर करून नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि सुलभ करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### प्रत्यक्ष पाहणीत वास्तव समोर

बसमधील सुट्ट्या पैशांचा वाद, बसथांब्यावर बस न थांबवणे आणि प्रवाशांशी होणारी वागणूक या तक्रारींची सत्यता जाणून घेण्यासाठी परिवहन मंत्र्यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता सामान्य प्रवाशाच्या वेशात पाहणी केली. या पाहणीत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील अनेक त्रुटी समोर आल्या.

# व्हिएतनाममध्ये पर्यटकांची स्पीडबोट उलटली; १५ भारतीयांचा मृत्यू

**महाईन्यूज । हनोई**

**व्हिएतनाममधील प्रसिद्ध पर्यटनस्थळ फू क्वॉक बेटाजवळ शनिवारी पर्यटकांची स्पीडबोट उलटून झालेल्या भीषण दुर्घटनेत १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला, तर २३ जणांची सुटका करण्यात आली. बचावलेल्या दोघांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेनंतर व्हिएतनाम सरकारने चौकशीचे आदेश दिले असून भारतीय दूतावासाने मदत आणि समन्वयासाठी नियंत्रण कक्ष सुरू केला आहे.**



### बोटीत किती जण होते?

दुर्घटनाग्रस्त स्पीडबोटमध्ये ३२ भारतीय पर्यटक आणि ४ चालक असे एकूण ३६ जण होते. इंजिनात बिघाड झाल्यानंतर बोट उलटल्याने १५ भारतीयांचा मृत्यू, तर २३ जणांची सुटका करण्यात आली. बचावलेल्या दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, स्पीडबोटमध्ये ३२ भारतीय पर्यटकांसह चार कर्मचारी असे एकूण ३६ जण होते. आन थोई द्वीपसमूहातील होन माय रुट न्गोआई बेटापासून सुमारे ४०० मीटर अंतरावर असताना बोटीच्या इंजिनात बिघाड झाला. त्यानंतर समुद्रातील जोरदार वारे आणि उंच लाटांमुळे बोट उलटली. अनेक पर्यटक बोटीखाली अडकल्याने त्यांना बाहेर पडता आले नाही.

दुर्घटनेनंतर परिसरातील पर्यटन नौकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेत बुडणाऱ्या पर्यटकांना फ्लोटर्स फेकले. त्यानंतर व्हिएतनामचे सीमारक्षक दल, नौदल, तटरक्षक दल आणि अन्य बचाव पथकांनी संयुक्त मोहीम राबवून २३ जणांना सुरक्षित बाहेर काढले. त्यांना किनाऱ्यावर आणून तातडीने वैद्यकीय उपचार देण्यात आले.

मृतांमध्ये तामिळनाडूतील १०, आंध्र प्रदेशातील २ आणि केरळमधील २ पर्यटकांचा समावेश असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. उर्वरित मृत व्यक्तीची ओळख निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या दुर्घटनेबद्दल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या. जखमी लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना त्यांनी केली. लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त करत भारत सरकारने व्हिएतनाम प्रशासनाशी समन्वय साधून मदतकार्याला गती द्यावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, हनोई येथील भारतीय दूतावास आणि हो ची मिन्ह सिटी येथील भारतीय वाणिज्य दूतावासाने भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी विशेष नियंत्रण कक्ष सुरू केला असून, प्रभावित कुटुंबीयांना आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून दिली जात असल्याचे सांगण्यात आले आहे.

### पंतप्रधान मोदींकडून शोक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या. जखमी लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना करत भारतीय दूतावास आणि वाणिज्य दूतावास मदतकार्य करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# शर्वरीची मराठमोळी आवड..



अभिनेत्री शर्वरी वाघ नुकतीच एका मोठ्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून, एका प्रसिद्ध ट्रॅकिंग वेबसाईटनुसार या चित्रपटाने जगभरात अवघ्या सात दिवसांत ७९.२१ कोटींची मोठी कमाई केली आहे. अशातच या अभिनेत्रीचा आणखी एक नवा व्हिडीओ सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. शर्वरीने काही दिवसांपूर्वीच एका प्रसिद्ध डिजिटल टॉक शोला मुलाखत दिली होती. या मुलाखतीदरम्यान तिला एक रंजक टास्क देण्यात आला होता. यामध्ये तिला दोन खाद्यपदार्थांची नावे सांगितली जाणार होती आणि त्यापैकी तिला सर्वात जास्त आवडणारा कोणताही एक पदार्थ निवडायचा होता. या खेळात तिला सर्वप्रथम विचारण्यात आले की, पावभाजी की मिसळपाव? त्यावर शर्वरीने क्षणाचाही विचार न करता 'मिसळपाव' असे उत्तर दिले. पुढे तिला वडापाव की कोथिंबीर वडी असा पर्याय देण्यात आला, त्यावर तिने 'कोथिंबीर वडी'ला पसंती दिली. त्यानंतर थालीपीठ की साबुदाणा खिचडी? या प्रश्नाचे उत्तर देताना तिने 'साबुदाणा खिचडी' निवडली. याच व्हिडीओमध्ये पुढे तिला महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय असलेल्या दोन गोड पदार्थांमधून एकाची निवड करण्यास सांगण्यात आले, ते पदार्थ म्हणजे 'पुरणपोळी की उकडीचे मोदक?'. या दोन पदार्थांचे नाव ऐकताच शर्वरी कमालीची संभ्रमात पडली आणि तिला दोघांमधून एकाचीही निवड करता आली नाही.

# कोरियन चित्रपटात अनुष्का सेन



अभिनेत्री अनुष्का सेनने मोठे यश मिळविले आहे. दक्षिण कोरियन चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारी ती पहिली भारतीय अभिनेत्री ठरणार आहे. 23 वर्षी अनुष्का आगामी रोमँटिक म्युझिकल ड्रामा 'जेजू ओले'मध्ये काम करणार आहे. हा चित्रपट भारत आणि दक्षिण कोरियादरम्यान एक सांस्कृतिक सहकार्याचा प्रोजेक्ट असणार आहे. चित्रपटात अनुष्काने अलीशा नावाची भूमिका साकारली असून ती स्वत:च्या बहिणीला गमाविण्याच्या दु:खातून सावरण्याचा प्रयत्न करत दक्षिण कोरियातील सुंदर बेट जेजूवर पोहोचते. तेथे ती स्वत:च्या भावना समजून घेत आयुष्य सावरण्याचा प्रयत्न करते, तर गायक-गीतकार सुनवू (कोरियन अभिनेता कांग ह्युंग-सेओकने साकारलेली भूमिका)सोबत तिचे नाते जडते. चित्रपटाची कहाणी जेजू बेटाच्या सुंदर ठिकाणांवर आधारित आहे. दक्षिण कोरियाचा हा चित्रपट जगभरातील प्रेक्षकांसाठी निर्माण करण्यात आला आहे. तर याचे चित्रिकरण पूर्ण जेजू बेटावर पार पडले आहे. सध्या हा चित्रपट दक्षिण कोरिया, भारत आणि अन्य आशियाई तसेच मध्यपूर्वेतील देशांमध्ये प्रदर्शित करण्याची योजना आहे.




# 'सतलुज' चित्रपटावर बंदी का?

पंजाबमध्ये नव्वदच्या दशकात दहशतवादाच्या नावाखाली हजारो शीख तरुण बेपत्ता झाल्याचा दावा पुराव्यांसह जगासमोर मांडणारे मानवाधिकार कार्यकर्ते जसवंत सिंह खालरा यांचे १९९५ मध्ये अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. आता तीन दशकांनंतर त्यांच्या आयुष्यावर आधारित चित्रपटाच्या निमित्ताने हा वाद पुन्हा ऐरणीवर आला आहे. सुरुवातीला 'पंजाब 95' या चित्रपटात केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने १२७ बदल सुचवले. चित्रपट निर्मात्यांनी हे बदल नाकारल्यामुळे चित्रपट तीन वर्षे रखडला. अखेर त्याचे नाव बदलून 'सतलुज' असे करण्यात आले. कोणतीही जाहिरात न करता हा चित्रपट थेट एका मोठ्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करण्यात आला. प्रेक्षक आणि समीक्षकांकडून भरभरून कौतुक होत असतानाच, अवघ्या दोन दिवसांत तो भारतातून अचानक हटवण्यात आला. प्लॅटफॉर्मने 'कायदेशीर प्रक्रिया' सुरू असल्याचे सांगत चित्रपट तात्पुरता हटवल्याचे स्पष्ट केले, तर मुख्य अभिनेता दिलजीत दोसांझने मी अंधाराला आव्हान देतो, अशी पोस्ट लिहीत- ही कथा जाणीवपूर्वक दडपली जात असल्याचा सूचक इशारा दिला. १९८४ ते १९९४ दरम्यान पंजाबमधील रक्तरंजित कालखंडात तब्बल २५ हजार शीख तरुण बेपत्ता झाल्याचा दावा जसवंत सिंह यांनी केला होता. अमृतसर सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेत संचालक आणि शिरोमणी अकाली दलाच्या मानवाधिकार शाखेशी संबंधित असलेल्या खालरा यांनी या बेपत्ता तरुणांचा शोध सुरू केला. त्यांनी अनेक स्मशानभूमींना भेटी देऊन मृतदेह जाळण्यासाठी खरेदी केलेल्या लाकडाच्या पावत्या आणि नोंदी गोळा केल्या. या सरकारी नोंदींवरून समोर आले की, पोलिसांनी सुमारे २००० तरुणांना बेवारस घोषित करून त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले होते किंवा मृतदेह नदी-नाल्यांमध्ये फेकून दिले होते. या प्रेसनोटनंतर काही महिन्यांतच, ६ सप्टेंबर १९९५ रोजी जसवंत सिंह यांचे त्यांच्या घराबाहेरून पंजाब पोलिसांनी अपहरण केले. त्यांचे शेजारी राजीव सिंह व कृपाल सिंह रंधवा या घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. प्रत्यक्षदर्शींच्या आणि तत्कालीन विशेष पोलीस अधिकारी कुलदीप सिंह यांच्या साक्षीनूसार, अपहरणाच्या दीड महिन्यानंतर जसवंत सिंह यांचा अमानुष छळ करून त्यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आणि मृतदेह हरिके कालव्यात फेकून देण्यात आला. हा खटला सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचला. सीबीआय तपासात पंजाब पोलिसांनी अनेक बनावट चकमकी केल्याचे सिद्ध झाले. डिसेंबर २०२४ पर्यंत सीबीआयने दाखल केलेल्या ७० पैकी ५८ प्रकरणांमध्ये न्यायालयाने पोलिसांना दोषी ठरवले. खालरा यांच्या हत्येप्रकरणी माजी डीएसपी जसपाल सिंह आणि कॉन्स्टेबल अमरजीत सिंह यांना जन्मठेप, तर इतर दोषी पोलिसांना ७ वर्षांची शिक्षा झाली. २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेही ही शिक्षा कायम ठेवली. हा सत्य लढा सोपा नव्हता. साक्षीदारांवर साक्ष बदलण्यासाठी प्रचंड दबाव आणण्यात आला. कृपाल सिंह यांच्यावर पोलिसांकडून बलात्काराचा खोटा गुन्हासुद्धा दाखल करण्यात आला, जो नंतर न्यायालयाने फेटाळला. त्यांना देश सोडून जाण्यासाठी करोडो रुपयांची आमिषेही दाखवण्यात आली, परंतु ते आपल्या साक्षीवर ठाम राहिले. विशेष म्हणजे जसवंत सिंह यांचे कुटुंब पिढ्यानपिढ्या स्वातंत्र्यलढ्यात सामील होते. त्यांचे आजोबा बाबा हरनाम सिंह यांना इंग्रजांनी फाशी दिली होती, तर वडील कर्तार सिंह यांनी 'भारत छोडो' आंदोलनात तुरुंगवास भोगला होता.

# अर्जेंटिना संघ सेमीफायनलमध्ये!

## १२० मिनिटांच्या थरारानंतर मेस्सीचा संघ विजयी; ९ मिनिटांत दोन गोल

**महाईन्यूज । लॉस एंजेलिस**

**लिओनेल मेस्सीच्या नेतृत्त्वाखालील अर्जेंटिना संघाने स्पर्धेच्या सेमीफायनलमध्ये धडक मारली आहे. स्वित्झर्लंडविरूद्ध १२० मिनिटं झालेल्या क्वार्टर फायनलच्या सामन्यात ३-१ च्या फरकाने शानदार पराभव केला. तब्बल १२० मिनिटांच्या दमछाक करणाऱ्या लढतीनंतर अखेर विद्यमान विश्वविजेत्या अर्जेंटिनाने उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. ब्रिल एम्बोलोला वादग्रस्त रेड कार्ड मिळाल्यानंतर स्वित्झर्लंडला १० खेळाडूंसह खेळावं लागलं. तरीही त्यांनी अप्रतिम बचाव करत सामना पेनल्टी शूटआउटकडे नेण्याचा प्रयत्न केला. पण अल्वारेझ व मार्टिनेझच्या गोलमुळे स्वित्झर्लंडचा संघ जादू दाखवू शकला नाही.**

अर्जेंटिनाने सामन्याला सुरूवात होताच १०व्या मिनिटाला गोल केला. कॉर्नरमधून मेस्सीने असिस्ट केल्यानंतर मॅक ॲलिस्टरने कमालीचा हेडर मारत गोल केला. यंदाच्या फिफा विश्वचषकातील हा अर्जेंटिनाचा सर्वात जलद गोल होता. यानंतर संपूर्ण सामन्यात अर्जेंटिनाचा संघ डिफेंड करताना दिसला. अखेरीस अर्जेंटिनाची बचाव फळी भेदत स्वित्झर्लंडने ६७व्या मिनिटाला गोल केला. यानंतर सामना संपेपर्यंत अथक प्रयत्नांनंतरही अर्जेंटिनाला गोल करता आला नाही. ९० मिनिटांत अधिक ९ मिनिटांचा वेळ देण्यात आला. त्यातही सामना १-१ असा बरोबरीत राहिला.

त्यानंतर १५-१५ मिनिटांचे दोन हाफ खेळवण्यात आले. या वेळेत सर्वाधिक वेळ चेंडू अर्जेंटिनाकडे होता, पण स्वित्झर्लंडने १० खेळाडूंसह देखील कमालीचा बचाव केला आणि मेस्सीला पास देण्याचीही संधी फार कमी दिली गेली. पण ज्युलियन अल्वारेझने ही बचावफळी भेदत जबरदस्त गोल केला. अतिरिक्त वेळेत ज्युलियन अल्वारेझने केलेल्या अप्रतिम गोलने सामन्याचं चित्र बदललं. त्यानंतर अतिरिक्त वेळेच्या अखेरीस लॉटारो मार्टिनेझने प्रतिआक्रमणावर आणखी एक गोल करत अर्जेंटिनाचा विजय निश्चित केला. विशेष म्हणजे या सामन्यात लिओनेल मेस्सीला एकही गोल करता आलेला नाही. मॅक ॲलिस्टरच्या पहिल्या गोलमध्ये मेस्सीच्या असिस्टचा समावेश होता.



# नॅशनल क्रश स्मृती मानधना आता 'लॉर्ड्सची क्वीन'!

**महाईन्यूज । लंडन**

**भारतीय महिला संघाची उपकर्णधार आणि धडाकेबाज सलामीवीर स्मृती मानधनाने क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या लंडनच्या ऐतिहासिक 'लॉर्ड्स' मैदानावर एक नवा इतिहास लिहिला आहे. लॉर्ड्सच्या आव्हानात्मक आणि वेगवान खेळपट्ट्यांवर जगातील भल्याभल्या फलंदाजांचा कस लागतो, त्याच मैदानावर स्मृतीने आपल्या उत्कृष्ट तंत्राचा आणि संयमाचा परिचय देत दोन्ही डावांत शानदार अर्धशतकी खेळी साकारल्या आणि जागतिक क्रिकेटमध्ये भारताचा डंका वाजवला. आता दुसऱ्या डावात स्मृती शतकाच्या दिशेने वाटचाल करत आहे.**



लॉर्ड्सच्या मैदानावर गेल्या १४२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला कसोटी सामना खेळवला जात आहे. भारत आणि इंग्लंड महिला संघांमधील या सामन्यात भारताचा संघ सध्या सामन्यात एक पाऊल पुढे आहे. सामन्याच्या दुसऱ्या दिवसाच्या शेवटपर्यंत भारत २६९ धावांनी आघाडीवर आहे. पहिल्या डावात टीम इंडियाने २८५ धावांची खेळी केली आणि प्रत्युत्तरात इंग्लंड संघाला १७० धावांवर सर्वबाद केलं. यानंतर दुसऱ्या डावात स्मृती मानधना व शफाली वर्मा यांनी पहिल्या विकेटसाठी ८८ धावांची भागीदारी रचली.

स्मृती मानधनाचा हा विक्रम केवळ तिच्या वैयक्तिक कारकिर्दीसाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतीय महिला क्रिकेटसाठी एक अत्यंत अभिमानास्पद सुवर्णक्षण ठरला आहे. स्मृतीने या ऐतिहासिक कामगिरीसह आपलं नाव क्रिकेटच्या इतिहासात कायमचं अजरामर केलं आहे. तिच्या या अद्वितीय खेळीमुळे भारतीय संघाने सामन्यावर मजबूत पकड मिळवली आहे.

सध्या दुसऱ्या डावात भारतीय संघ फलंदाजी करत असून सफाली वर्मा ३३ धावांवर बाद झाली. शफाली वर्मा व स्मृती मानधना यांनी पहिल्या विकेटसाठी ८८ धावांची भागीदारी केली. यानंतर मैदानावर आलेल्या यस्तिका भाटियाने स्मृतीला चांगली साथ दिली. या दोघींनी दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ६६ धावांची भागीदारी रचली. यस्तिका भाटिया ३९ धावांवर तर स्मृती ६९ धावांवर खेळत आहे. यासह दुसऱ्या डावात टीम इंडियाने १५४ धावा करत २६९ धावांची आघाडी घेतली आहे.

### लॉर्ड्सवर इतिहास घडवला

स्मृती मानधनाने पहिल्या डावात ५१ धावा, तर दुसऱ्या डावात ५३ धावांची खेळी करत लॉर्ड्सवर कसोटीच्या दोन्ही डावांत अर्धशतक झळकावणारी इतिहासातील पहिली महिला क्रिकेटपटू होण्याचा मान मिळवला. पहिल्या डावात स्मृती मानधना ८३ धावांवर बाद झाल्याने तिचं शतक हुकलं. तर आता दुसऱ्या डावात स्मृती ६९ धावा करत मैदानात कायम आहे. स्मृतीने १२४ चेंडूत ९ चौकार व एका षटकारासह ही खेळी केली आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। सोमवार ।
दि. 13 जुलै 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## नऊ जणांचा मृत्यू, चार दिवसांनी शोधकार्य पूर्ण

# मोशी दुर्घटनेचा दुर्दैवी शेवट






**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील कचरा डेपोमध्ये 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा ढीग कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेतील मृतांची संख्या नऊवर पोहोचली आहे. शनिवारी दिवसभर सुरू असलेल्या शोधमोहीमेनंतर मध्यरात्री एक वाजता कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या आणखी एका व्यक्तीचा मृतदेह हाती लागला. त्यानंतर चार दिवसांपासून सुरू असलेले बचाव व शोधकार्य अधिकृतपणे संपविण्यात आले.**

आठ जुलै रोजी दुपारी दीडच्या सुमारास मोशी कचरा डेपोतील 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा प्रचंड ढीग कोसळला. या दुर्घटनेत इमारतीत २२ आणि इमारतीशेजारी कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली एक अशा एकूण २३ जण अडकले होते. त्यापैकी पाच जण स्वतः बाहेर पडले, तर नऊ जणांना बचाव पथकाने सुखरूप बाहेर काढले. उर्वरित नागरिकांचा शोध घेण्यासाठी भारतीय सेना, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए अग्निशमन दल आणि पोलिसांनी संयुक्त मोहीम राबविली.

दुर्घटनाग्रस्त इमारत अत्यंत धोकादायक आणि अस्थिर असल्याने बचावकार्याला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. इमारतीभोवतीचा मलबा हटविण्यासाठी १२ पोकलेन, जेसीबी आणि डंपरचा वापर करण्यात आला. त्यानंतर दोन अत्याधुनिक डिमोलिशन एक्सकॅव्हेटरच्या सहाय्याने इमारतीचा धोकादायक भाग नियंत्रित पद्धतीने हटवून आत प्रवेश करण्यात आला.

शनिवारी दिवसभराच्या शोधमोहीमेत अक्षय सावंत, सुनील कोरके, सन्नी माने, महेश कुंभार, नागेश गायकवाड, रणजीत पाटील आणि राहुल गायकवाड यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. त्याआधी गुरुवारी भावेश वाणी यांचा मृतदेह सापडला होता. दरम्यान, इमारतीशेजारील कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या वामन कसबे यांचा शोध घेण्यासाठी एनडीआरएफच्या श्वान पथकाची मदत घेण्यात आली. मध्यरात्री एक वाजता त्यांचा मृतदेह सापडला. सर्व मृतदेह वायसीएम रुग्णालयात नेण्यात आले असून वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.

या दुर्घटनेत एकूण नऊ जणांचा मृत्यू झाला असून चार दिवसांपासून सुरू असलेले बचाव आणि शोधकार्य रविवारी मध्यरात्री पूर्ण करण्यात आले.

## २३ जण अडकले, १४ जणांची सुटका

दुर्घटनेवेळी एकूण २३ जण अडकले होते. त्यापैकी पाच जण स्वतः बाहेर पडले, तर नऊ जणांना बचाव पथकाने सुखरूप बाहेर काढले. उर्वरित नऊ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

## मृतांची संख्या नऊवर

मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील शोधमोहीम रविवारी मध्यरात्री एक वाजता पूर्ण झाली. मध्यरात्री वामन कसबे यांचा मृतदेह कचऱ्याच्या ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आला. यापूर्वी आठ जणांचे मृतदेह सापडले होते. त्यामुळे या भीषण दुर्घटनेतील मृतांचा आकडा नऊवर पोहोचला आहे. बचावकार्यात भारतीय सेना, एनडीआरएफ, महापालिका, पीएमआरडीए अग्निशमन दल आणि पोलिसांनी सलग चार दिवस संयुक्तपणे काम केले.

## चार दिवसांची बचावमोहीम अखेर संपली

आठ जुलै रोजी दुपारी सुरू झालेली बचाव व शोधमोहीम तब्बल चार दिवस अखंड सुरू होती. भारतीय सेना, एनडीआरएफ, महापालिका, पीएमआरडीए अग्निशमन दल आणि पोलिसांच्या संयुक्त प्रयत्नांनंतर रविवारी मध्यरात्री एक वाजता अखेरची व्यक्ती सापडली आणि शोधकार्य अधिकृतपणे संपुष्टात आले.

## श्वान पथकामुळे लागला अखेरचा शोध

कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या वामन कसबे यांचा शोध घेण्यासाठी एनडीआरएफच्या श्वान पथकाची मदत घेण्यात आली. मध्यरात्री एक वाजता त्यांचा मृतदेह हाती लागल्यानंतर चार दिवसांची शोधमोहीम पूर्ण झाल्याची घोषणा करण्यात आली.

## अत्याधुनिक यंत्रसामग्रीची घेतली मदत

दुर्घटनाग्रस्त इमारत अस्थिर असल्याने बचावकार्याला मोठ्या अडचणी आल्या. मलबा हटविण्यासाठी १२ पोकलेन, जेसीबी, डंपर तसेच दोन अत्याधुनिक डिमोलिशन एक्सकॅव्हेटरचा वापर करण्यात आला. एनडीआरएफच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली इमारतीचा धोकादायक भाग हटवून बचाव पथकाने आत प्रवेश केला.

# पवना धरणात ७० टक्के पाणीसाठा

## पिंपरी-चिंचवडकरांची पाण्याची चिंता मिटली; धरणक्षेत्रात मुसळधार पाऊस

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मावळातील पवना धरण क्षेत्रात मागील चार ते पाच दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील पाणी पातळीत कमालीची वाढ झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहराला प्रामुख्याने पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठा आता ७४ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरण क्षेत्रात झालेल्या या दमदार पावसामुळे शहरवासीयांची पिण्याच्या पाण्याची चिंता तूर्तास मिटली आहे.**



या पार्श्वभूमीवर, महापालिकेने जून महिन्यात लागू केलेली १५ टक्के पाणी कपात आता त्वरित रद्द करावी, अशी आग्रही मागणी शहरातील नागरिकांमधून आणि विविध सामाजिक संघटनांमधून होऊ लागली आहे. यंदाच्या वर्षी मान्सून लांबल्यामुळे जून महिन्याच्या मध्यात पवना धरणातील पाणीसाठा अवघा १६ टक्क्यांपर्यंत खाली घसरला होता. त्यामुळे जलसंपदा विभाग आणि महापालिकेने खबरदारीचा उपाय म्हणून १९ जूनपासून संपूर्ण शहरात १५ टक्के पाणी कपात लागू केली होती. यामुळे शहरातील अनेक भागांत एक ते दीड तासाने पाण्याचा वेळ कमी करण्यात आला होता, ज्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता.

परंतु, जुलै महिन्याच्या सुरुवातीपासूनच मावळ भागात पावसाने जोरदार पुनरागमन केले. मागील ४-५ दिवसांत लोणावळा, कार्ला आणि पवननगर भागात झालेल्या ढगफुटीसदृश आणि मुसळधार पावसामुळे धरणात पाण्याची आवक अत्यंत वेगाने वाढली. केवळ दोन ते तीन दिवसांत धरणाचा जलसाठा वेगाने वाढत थेट ७० टक्क्यांच्या आकड्यावर पोहोचला आहे. यामुळे पिंपरी-चिंचवडकरांची पुढील आठ ते दहा महिन्यांची पाण्याची चिंता पूर्णपणे दूर झाली आहे.

पवना धरणातील पाणी साठ्याची स्थिती समाधानकारक झाल्याचे समजताच शहरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र, त्याच वेळी पाणी कपातीमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी आता प्रशासनाने ही कपात मागे घ्यावी, अशी मागणी आहे. शहरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी कपातीमुळे दररोज पाण्याचे टँकर्स मागवावे लागत आहेत, ज्यामुळे रहिवाशांवर आर्थिक भुर्दंड पडत आहे. लोकप्रतिनिधी आणि विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनीही या मागणीला पाठिंबा दिला असून, महापालिका आयुक्तांनी याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, असे आवाहन केले आहे.

### महापालिका प्रशासनाची भूमिका

नागरिकांच्या वाढत्या मागणीनंतर आता सर्वांचे लक्ष पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जलसंपदा विभागाच्या निर्णयाकडे लागले आहे. प्रशासन सध्या धरण क्षेत्रातील पावसाच्या पुढील अंदाजावर आणि येत्या काही दिवसांतील पाणी साठ्याच्या स्थिरतेवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. धरणातील साठा ७५ ते ८० टक्क्यांच्या पुढे गेल्यास किंवा पावसाचा हाच जोर कायम राहिल्यास, येत्या दोन ते तीन दिवसांत १५ टक्के पाणी कपात अधिकृतपणे रद्द करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. सध्याची स्थिती पाहता शहरावरील पाण्याचे संकट टळले असले, तरी प्रशासनाकडून कपात रद्द होण्याची अधिकृत घोषणा कधी होते, याकडे संपूर्ण पिंपरी-चिंचवडकरांचे डोळे लागले आहेत.

# पुनावळे येथे PMPML बसच्या धडकेत ६ वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुनावळे परिसरात PMPML बसच्या धडकेत सहा वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी रावेत पोलिस ठाण्यात बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना शनिवारी (दि. ११ जुलै) सकाळी सव्वाअकराच्या सुमारास पुनावळे ते किवळे मार्गावर पवना ब्रिजच्या अलीकडे तुकाई नर्सरीजवळील सर्व्हिस रोडवर घडली.

महिला फिर्यादी आपल्या मुलगी खुशबूसोबत MH 14 LK 2362 क्रमांकाच्या स्कूटीवरून जात होत्या. त्यावेळी समोरून येणाऱ्या MH 12 QG 2079 क्रमांकाच्या PMPML बसच्या चालकाने सर्व्हिस रोडवरील एका वाहनाला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. पोलिस नोंदीनुसार, बसचालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे बस चालवली.

ओव्हरटेक करताना बसच्या मागील बाजूचा स्कूटीला धक्का लागला. त्यामुळे स्कूटीवरील मायलेकींचा तोल गेला. याचवेळी खुशबू बसच्या मागील चाकाखाली पडली. गंभीर दुखापत झाल्याने तिचा मृत्यू झाला.

आईच्या डोळ्यांसमोर घडलेल्या या भीषण घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. एका ओव्हरटेकच्या प्रयत्नाने चिमुकलीचा जीव गेल्याने PMPML बसचालकांच्या वाहन चालवण्याच्या पद्धतीवर पुन्हा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

याप्रकरणी रावेत पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१, १०६ (१) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक टार्फे करीत आहेत.

# तडीपार गुन्हेगाराला कोयत्यासह रावेत पोलिसांकडून अटक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



तडीपार आदेशाचे उल्लंघन करून खुलेआम सार्वजनिक ठिकाणी कोयता बाळगून फिरणाऱ्या एका गुन्हेगाराला रावेत पोलिसांनी अटक केली आहे. प्रेम गोरक्ष साकोरे (वय २४, रा. विठ्ठल रेसिडेन्सी फेज-१, आदर्श नगर, किवळे, ता. हवेली, जि. पुणे) या तडीपार गुन्हेगाराला अटक करण्यात आली आहे.

रावेत पोलिसांनी ही कारवाई दि.१० जुलै रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास शिंदेवस्ती ते गणेशनगर जाणाऱ्या ८० फूट डांबरी रस्त्यालगत, व्हिक्टरी क्रिकेट अकॅडमीसमोरील मोकळ्या जागेत केली आहे. रावेत पोलिस ठाण्यातील तपास पथकाचे पोलीस कर्मचारी प्रदीप कामाजी गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीवर १० नोव्हेंबर २०२५ रोजी तडीपारची कारवाई करण्यात आली होती. त्याला पुणे जिल्ह्यातून एक वर्षाच्या कालावधीसाठी हद्दपार करण्यात आले असतानाही तो विनापरवानगी परिसरात आढळून आला. यावेळी त्याच्याकडून सुमारे ८५० रुपये किमतीचा लोखंडी कोयता जप्त करण्यात आला. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास रावेत पोलीस करत आहेत.

# वाहतूक पोलिसांचा 'ट्राफिक बडी' उपक्रम प्रभावी

## एका महिन्यात १,६३८ तक्रारी निकाली; व्हॉट्सअॅप चॅटबॉटद्वारे तातडीने कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी आणि वाहतूक विषयक तक्रारींचे त्वरित निराकरण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'ट्राफिक बडी' या ऑनलाइन व्हॉट्सअॅप चॅटबॉटला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. जून २०२६ या एका महिन्यात या माध्यमातून प्राप्त झालेल्या १ हजार ६३८ तक्रारींचा यशस्वी निपटारा करण्यात आल्याची माहिती वाहतूक शाखेने दिली.**




पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशानुसार, पोलीस सहआयुक्त शशिकांत महावरकर आणि अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 'ट्राफिक बडी' हा ऑनलाइन व्हॉट्सअॅप चॅटबॉट उपक्रम सुरू करण्यात आला आहे. वाहतूक कोंडी, वाहतूक नियमन आणि इतर वाहतूक विषयक समस्यांवर नागरिकांना त्वरित उपाय उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

वाहतूक शाखेच्या माहितीनुसार, जून २०२६ या महिन्यात पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून प्राप्त झालेल्या एकूण १,६३८ तक्रारींचे निराकरण 'ट्राफिक बडी'च्या माध्यमातून करण्यात आले.

वाहतूक पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, वाहतूक कोंडी, वाहतूक नियमन अथवा इतर वाहतूकविषयक अडचणींसंदर्भात 'ट्राफिक बडी' व्हॉट्सअॅप चॅटबॉट (८७८८६४९८८५) या क्रमांकाचा अधिकाधिक वापर करावा. या माध्यमातून तक्रारी नोंदविल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करून समस्यांचे निराकरण करण्यात येणार असल्याचे वाहतूक विभागाने स्पष्ट केले.

पोलीस उपआयुक्त (वाहतूक) विवेक देशमुख यांनी नागरिकांनी या डिजिटल सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## चाकणमध्ये ८ किलो गांजासह एकाला अटक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**




चाकण परिसरात अमली पदार्थांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाई करत ८ किलो २९० ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या गांजाची अंदाजे किंमत ४ लाख १४ हजार ६०० रुपये असून, याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर गांजा पुरविणारा संशयित आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

ही कारवाई शुक्रवार (दि. १० जुलै) रोजी दुपारी दोनच्या सुमारास नाणेकरवाडी, ता. खेड येथील जीएमपी ऑटो कंपनीच्या पाठीमागील मोकळ्या जागेत करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलीप मधुकर शिंदे (सध्या रा. बालाजीनगर, मेदनकरवाडी, ता. खेड, जि. पुणे; मूळ रा. अंतरवाली टेंभी, ता. घनसावंगी, जि. जालना) याच्या ताब्यात ८ किलो २९० ग्रॅम वजनाचा गांजा बेकायदेशीररीत्या आढळून आला. आरोपीने गांजा ताब्यात बाळगून त्याची वाहतूक केल्याचे पोलिसांच्या कारवाईत समोर आले आहे.

चौकशीदरम्यान हा गांजा समीर तडवी याच्याकडून आणल्याचे आरोपीने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानुसार दिलीप शिंदे याच्यासह गांजा पुरविणाऱ्या समीर तडवी याच्याविरोधात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समीर तडवी हा सध्या फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

याप्रकरणी चाकण दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५७५/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा १९८५ मधील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक मोते पुढील तपास करीत आहेत.

## आकुर्डी-चिंचवड लिंक रोडवर 'हिट अँड रन'

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आकुर्डी-चिंचवड लिंक रोडवर भरधाव वेगात आलेल्या अज्ञात दुचाकीने ६० वर्षीय पादचाऱ्याला पाठीमागून जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या पादचाऱ्याचा मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे अपघातानंतर जखमी व्यक्तीला कोणतीही वैद्यकीय मदत न करता आणि पोलिसांना माहिती न देता दुचाकीस्वार घटनास्थळावरून पसार झाला.**




राजाराम जनार्धन माने (वय ६०) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचा मुलगा पवन राजाराम माने (वय २६, रा. मोहननगर, चिंचवड) यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार (दि. १० जुलै) रात्री सुमारे ८ वाजून ३ मिनिटांच्या सुमारास राजाराम माने हे गंगानगर, आकुर्डीकडून चिंचवडच्या दिशेने पायी जात होते. आकुर्डी-चिंचवड लिंक रोडवरील ब्रिजच्या पुढे टयाल कॉर्प बांधकाम साईटजवळ पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या अज्ञात दुचाकीस्वाराने त्यांना जोरदार धडक दिली.

दुचाकीस्वाराने रस्त्याची परिस्थिती आणि सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करत हयगयीने, बेदरकारपणे आणि धोकादायक पद्धतीने वाहन चालवल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. धडकेनंतर राजाराम माने रस्त्यावर कोसळले आणि गंभीर जखमी झाले. या दुखापतीमुळे त्यांचा मृत्यू झाला.

अपघातानंतर दुचाकीस्वाराने जखमी माने यांना वैद्यकीय मदत करण्याऐवजी घटनास्थळावरून पळ काढला. तसेच अपघाताची माहिती पोलिसांनाही दिली नाही. याप्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात अज्ञात दुचाकी चालकाविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६ (१), २८१, १२५ (अ), १२५ (ब) तसेच मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम १८४ आणि १३४ (१) (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास निगडी पोलीस करत आहेत. फरार दुचाकीस्वाराचा शोध सुरू आहे.

DYP
Dr. D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

D Y PATIL EDUCATIONAL COMPLEX
AKURDI, PUNE

43 Years of Excellence in Education

# Your Pathway to Leadership Begins at D Y PATIL

ADMISSIONS OPEN 2026-27

## Our Institutes

### COLLEGE OF ENGINEERING (AUTONOMOUS)
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & **NBA** NRI Quota Available
**UC**- Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A
**PG**- Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A
**PhD**- Mech / ENTC / Civil

### INSTITUTE OF MCA & MANAGEMENT
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & Affiliated to SPPU
MCA / MBA / PhD (Management)

### COLLEGE OF ARCHITECTURE
Accredited by **NAAC** with **'A'** Grade & Approved by COA
B.Arch / M.Arch (Construction Management) / D.Arch

### PGDM INSTITUTE
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
NRI Quota Avaliable
**Specializations:** Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics & Business Analytics with AI / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management

### COLLEGE OF AGRICULTURE BUSINESS MANAGEMENT
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
BSc (Hons) Agri Business Management

### COLLEGE OF PHARMACY
Accredited by **NBA** & **NAAC** with **'A+'** Grade
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
D.Pharm / B.Pharm / Pharm D. / M.Pharm (Pharmaceutics) / M.Pharm (Pharmaceutical Quality Assurance) / M.Pharm (Pharmaceutical Chemistry) / M.Pharm (Pharmacology) / M.Pharm (Regulatory Affairs) / M.Pharm (Phytopharmacy & Phytomedicine)

### INSTITUTE OF PHARMACY
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
D.Pharm

### Y B PATIL POLYTECHNIC
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
(Accredited by **NBA**)
Diploma in Civil / Mech / Comp / E&C

## Why Choose Us?

- Green & Modern Campus
- Smart Classrooms & Digital Learning
- Experienced Faculty & Excellence
- Global University Collaborations
- Wi-Fi Campus & Modern Facilities
- Sports, Cafeteria & Auditorium
- Safe & Disciplined Environment
- International Academic Tours
- Modern Boys & Girls Hostels
- DYP Dnyansagar Incubation Foundation

**Address:** Sector No. 29, Nigdi Pradhikaran, Akurdi, Pune 411044, Maharashtra, India
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE